# कर्ज आणि गहाणखत करार

१. ह्या मुख्य करारात ("करार") नामे कर्जदार आणि सहकर्जदार यांच्या कर्ज परतफेडीचे वेळापत्रकात आहे, त्यात निवासाचा पत्ता किंवा जर लागू असेल तर व्यवसायाचा पत्ता दिला आहे, यानंतर उल्लेखित(**"कर्जदार"**), आणि डी लेग लँडन फायनॅन्शीयल सर्विसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कंपनी कायदा, २०१३ द्वारे स्थापित कंपनी जिचे नोंदणीकृत कार्यालय २०/फ, टॉवर ए, पेनिनसुला बिजनेस पार्क, सेनापती बापट मार्ग, लोवर परेल, मुंबई ४०० ०१३ येथे आहे, आणि त्याची शाखा दिल्ली येथे आहे. यापुढे उल्लेखित (**"कर्ज देणारा"**). कर्जदार हा "तूम्ही" किंवा"तुम्हीं" म्हणून उल्लेखित आणि कर्ज देणारा "आम्ही" "आमचे" किंवा"आपले" म्हणून उल्लेखित. कर्जदार आणि कर्ज देणारा यापुढे स्वतंत्र **"पार्टी"** आणि एकत्रितरित्या **"पार्टीज"** म्हणून संबोधित. कर्ज देणारा आपले कर्ज उत्पादन "एस्कॉर्टस क्रेडीट" या ट्रेड नावाखाली आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देईल, ज्या कंपनी चे नोंदणीकृत कार्यालय एससीओ २३२, पहिला मजला, सेक्टर २०, पंचकुला - १३४ १०९ येथे आहे. तुम्ही आम्हाला या करार अंतर्गत असलेल्या अटी आणि नियमांनुसार कर्ज मंजूर करण्यासाठी विनंती केली आहे. या कराराअंतर्गत पार्टीज ना मान्य आहे की निर्धारित करण्यात आलेल्या नियम आणि अटी, आणि त्यांच्यातील बंधक करार अस्तित्वात येईल ज्यावेळी कर्ज देणारा कर्ज परतफेडीचे वेळापत्रक स्वाक्षरीने मान्य करेल आणि कर्जदाराची कर्जासाठीची मागणी मान्य करेल.(ज्यामध्ये सूचक कोटेशन चा समावेश असेल पण त्यासाठीच ते मर्यादित नाही). सूचक कोटेशन मध्ये जे व्यापारी नियम असतील ते कर्जदाराच्या लिखित वा तोंडी विनंती अथवा प्रस्तावानुसार बदलू शकतात. जर कर्जदाराने व्यावसाईक नियमांमध्ये बदल करण्यासाठी विनंती केली तर कर्ज देणाऱ्याने त्यानुसार केलेले बदल कर्जदाराला सूचित करणे आवश्यक आहे, त्यासाठी कर्ज परतफेडीचे वेळापत्रक निर्धारित करतांना तोंडी दिलेली सूचना. कर्ज परतफेडीचे वेळापत्रक आणि सूचक कोटेशन किंवा कर्जाच्या अर्जाच्या संबंधित मर्यादित नसलेल्या दुसऱ्या दस्तावेजामध्ये तफावत असेल तर, कर्ज परतफेडीचे वेळापत्रक हे अंतिम असून दोन्ही पार्टीज न ते पाळणे बंधनकारक असेल. या करारातील नियमांच्या विरोधात काहीही असले तरी कर्जदार आणि प्रत्येक सह-कर्जदार हे संयुक्तपणे कर्जदारांच्या जबाबदारी संदर्भात सर्वसाधारणपणे कर्जदेणाऱ्याप्रती उत्तरदायी असतील.

२. आम्ही आपल्याला कर्जमंजुरी देत आहोत आणि आमच्याकडून कर्ज रक्कम घेण्यास तुमची मान्यता आहे, जी कर्ज रक्कम परतफेड वेळापत्रकात लिहिली आहे जी (**"पतसुविधा"**) म्हणून उल्लेखित आहे आणि जी (**"लागू तारखेच्या"**) ६ आठवड्याच्या **"उपलब्धता काळात"** वितरीत झाली आहे. लागू तारिख म्हणजे कर्ज देणाऱ्याच्या नुसार पतसुविधा चालू केल्याची लागू तारीख जी रक्कम परतफेड वेळापत्रकात दिली आहे. या तारखेच्या आधी पतसुविधा स्वीकार प्रमाणपत्र नसेल(खाली दिल्याप्रमाणे). "**इक्विपमेंट**" म्हणजे जे कर्ज रक्कम परतफेड वेळापत्रकात आहे, आणि ज्याला मर्यादा नाही, अश्या भागांचे घटक आणि छोटे भाग, भविष्यातील वाढीव गोष्टी आणि बदललेले भाग, सर्व सॉफ्टवेअर आणि त्यासंबंधित सर्व सेवा आणि देखभाल करार यांचा समावेश आहे. इक्विपमेंट म्हणजे ज्यात **इक्विपमेंट** , मशिनरी, उपकरणे, घटक भाग आणि सुटे भाग यांचा समावेश होतो आणि सर्व सॉफ्टवेअर आणि त्यासंबंधित सर्व सेवा आणि देखभाल करार यांचा समावेश आहे.( भविष्यातील वाढीव गोष्टी आणि बदललेले भाग सर्व सॉफ्टवेअर आणि त्यासंबंधित सर्व सेवा आणि देखभाल करार) ज्या कर्जदाराकडून भविष्यात (कर्ज देणाऱ्याकडून) दिल्या जाणाऱ्या कर्जरक्कमेतून इक्विपमेंट निर्माता, विक्रेता, डीलर, पुनर्विक्रेता किंवा पुरवठादार (**व्हेंडर**) यांचेकडून खरेदी केल्या जातील त्यांचा समावेश आहे. **"स्वीकार प्रमाणपत्र"** म्हणजे प्रमाणपत्र/कर्जदाराची हमी ज्यामध्ये सुचक कोटेशन (खाली दिल्याप्रमाणे) वर कर्जदाराने शी केली आहे, ज्यामध्ये कर्जदाराने जाहीर केले आहे की त्याला इक्विपमेंट मिळाले असून ते व्यवस्थित आहे आणि ज्या गुणवत्ता मानकानुसार त्याची ऑर्डर होती त्याप्रमाणे ते आहे किंवा विक्रेत्याकडून डिलिव्हरी घेतल्यानंतर उपकरणांची पाहणी करण्याचा अधिकार सोडून देतो आणि उपकरणे विनाअट स्वीकारण्याचे मान्य करतो, कर्ज देणा-या कडून निश्चित केलेले प्रमाणपत्र आणि फॉर्म जो कर्ज देणाऱ्याच्या अटींवर कोणत्याही वेळी बदलला जाऊ शकतो. **"सूचक कोटेशन"** म्हणजे कर्जदारांच्या कर्जाच्या अर्जाच्या व्यावसाईक अटी. आधीच्या पूर्वग्रहांशिवाय, खालीलपैकी एकापेक्षा जास्त अटी लक्षात घेऊन तुम्ही हा करार स्वीकारला असेल तर (अ) क्लॉज १ मध्ये विशद केल्यानुसार कर्जदाराने कर्ज परतफेडीचे वेळापत्रक निर्धारित करण्याआधी करारातील व्यावसाईक अटी तोंडी स्वीकारणे; (ब) कर्ज घेणाऱ्या व्यक्तीकडून किंवा त्याच्या वतीने, कर्ज परतफेडीचे वेळापत्रकात नमूद केलेल्या प्रक्रिया शुल्काचे देणे; (क) करारासंदर्भात लागलेली स्टँप ड्युटी, कायदेशीर शुल्क आणि इतर शुल्क यांची आकारणी आणि वसुली (ड) कर्ज देणाऱ्याच्या सुरक्षेची नोंदणी, इक्विपमेंट इनव्हॉईस वरील निर्धारित आकारणी करून कर्जदाराची मान्यता (इ) क्लॉज २४ मध्ये विशद केल्यानुसार गहाण मालमत्तेचे नोंदणी प्रमाणपत्र देऊन कर्ज देणाऱ्याच्या सुरक्षेची नोंदणी; (फ) कर्ज देणाऱ्या ला वेळापत्रकानुसार एक किंवा त्यापेक्षा अधिक कर्जाच्या हफ्त्यांची परतफेड. जर अश्या प्रकारची परतफेड सूचक कोटेशन मध्ये अधिकृत केली असेल तर, कर्ज देणारा स्टँप ड्युटी चा काही भाग किंवा पूर्ण भाग वसूल करू शकतो, कायदेशीर शुल्क आणि इतर शुल्क यांची आकारणी आणि वसुली किंवा व्हेंडर कडे झालेला खर्च ज्याच्याकडून कर्ज घेणाऱ्याने खरेदी केली आहे, किंवा ज्याच्याकडून कर्जदाराने इक्विपमेंट खरेदी करण्याचे निश्चित केले आहे.

३. पतसुविधा देण्याच्या प्रक्रियेत कर्जदार पतमंजुरी झाल्याचा दाखला इक्विपमेंट खरेदी करण्यासाठी वापरू शकतो आणि सूचक कोटेशन चा किंवा कर्ज परतफेडीचे वेळापत्रकात तसा उल्लेख असतो., त्याचा उपयोग इक्विपमेंट चा अथवा कर्जदाराचा जीवन विमा, आरोग्य विमा किंवा काढण्यासाठी चांगल्या जीवनमानासाठी ("हेतू") असे उल्लेखित केला जाऊ शकतो. कर्ज देणारा हा पतसुविधेचा अंतिम वापर पडताळू शकत नाही. कर्जदाराने आपल्या रक्कमेतून आणि प्रयत्नांतून कर्ज देणाऱ्याला पतसुविधेच्या अंतिम वापराबाबत पुरावा द्यायचा आहे.

४. कर्ज देणाऱ्याला जोपर्यंत त्याला आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता होत नाही तोपर्यंत कर्जदाराला कोणतीही अग्रिम रक्कम देणार नाही यासठी अर्जाच्या फॉर्म मध्येच अटी लागू केलेल्या असतात त्याला (**"मागील अटी"**) असे म्हणतात. तुम्ही कर्ज मिळण्याच्या कराराच्या दिवशी किंवा त्याआधी कर्ज रक्कम परतफेड वेळापत्रकानुसार **"प्रक्रिया शुल्क"** भरणे आवश्यक आहे, हे शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. याबरोबरच कर्जदाराने सूचक कोटेशनद्वारे अधिकृतरीत्या मान्यता दिल्यानंतरच कर्ज देणारा हे शुल्क व्हेंडर ज्याच्याकडून खरेदी केली , किंवा ज्याच्याकडून कर्जदाराने इक्विपमेंट खरेदी करण्याचे निश्चित केले आहे त्याकडून वसूल करेल.

५. पतसुविधेच्या मागील अटी पूर्ण केल्यानंतर पतसुविधेची अग्रिम रक्कम किंवा पतसुविधा घेता येते. कर्ज देणारा या

पतसुविधेअंतर्गत कर्जदाराव्यतिरिक्त सरळ व्हेंडरला वितरण करतो (रक्कमेशिवाय इतर गोष्टी जसे विमा जारी करणे). कर्ज देणाऱ्याला अधिकार आहे की तो कर्जदाराकडून कोणतीही अतिरिक्त अटी पूर्ण करण्यास पात्र असेल, तो कर्जदारास पतसुविधा पूर्ण अथवा टप्प्या-टप्प्यात वितरीत करू शकतो. **"कर्ज"** म्हणजे पतसुविधा जी पूर्ण भागात किंवा काही भागात अग्रिम अथवा वितरीत केली गेली.

६. कर्जदार हि पतसुविधा रद्द करू शकतो (i) करारानुसार कमी करण्यात आलेली किंवा पतसुविधेचा रद्द करण्यात आलेला काही भाग. (ii) सर्व बाकी कर्जाची एकत्रित मुद्दल (जर असेल तर), कराराच्या अटी आणि नियमांनुसार आजच्या तारखेची उर्वरित मुद्दल **("उपलब्ध देय रक्कम")**, किंवा पतसुविधेचा २५% भाग (पंचवीस टक्के) किंवा त्याचा पूर्णांक गुणाकारी भाग, उपलब्ध कालावधीच्या वेळेत कोणत्याही वेळी लिखित नोटीस द्वारे १४ बीजनेस दिवसात असावी. या कराराच्या हेतूसाठी, **"बिजनेस दिवस"** म्हणजे (शनिवार आणि रविवार वगळता) मुंबई, भारत येथील बँक ज्या दिवशी व्यवहाराकरिता खुल्या असतात तो दिवस. जोपर्यंत कर्जदार कर्ज देणाऱ्याला रद्द करण्याच्या दिवशी अथवा त्याआधी रक्कम देणार नाही तोपर्यंत अश्या प्रकारचे रद्दीकरण होणारा नाही, यासाठी रद्दीकरण शुल्क रद्द केलेल्या रक्कमेच्या (१ %) असेल. उपलब्ध देय रक्कम किंवा तिचा काही भाग जर वापरला नाही किंवा उपलब्धता काळात (किंवा कर्ज देणाऱ्याच्या अधिकारात त्यांनी मुदत वाढवली असेल तर) अंतिम तिथी पर्यंत काढला गेला नाही तर पतसुविधा रद्द होऊ शकते, आणि रद्दीकरण केलेल्या उपलब्ध देय रक्कम रक्कमेवर (१%) इतका शुल्क लागेल जो कर्जदाराला द्यावा लागेल.

७. करारात दिल्याप्रमाणे कर्ज परतफेडीचे वेळापत्रकानुसार कर्ज आणि त्याचे व्याजाची संपूर्ण रक्कम कर्जदाराने अदा करायची आहे. कर्जाचा जो भाग कर्जदाराने अदा केला आहे तो त्याला/तिला परत कर्ज म्हणून घेता येणार नाही.

८. या करारानुसार कर्ज अस्तित्वात आल्यानंतरच्या तारखेपासून एक (१) वर्षांच्या आत आणि १४ बिजनेस दिवसाच्या लेखी नोटीस नंतर, कर्जदार. कोणत्याही देय तिथीला त्याच्या कर्जाची सर्व थकीत रक्कम पूर्णपणे अदा करू शकतो (भागश: रक्कम नाही), यासाठी थकीत देय रक्कमेसोबत चार (४%) शुल्क देय असेल याशिवाय पतपुरवठा शुल्क, घसारा, जोखीमेचे शुल्क आणि कर्ज देणाऱ्याकडून आकारले जाणारे शुल्क लागेल. कर्ज देणारा कर्ज देणाऱ्याला त्याच्या/तिच्या विनंतीनुसार मुदतपूर्व कर्ज समाप्ती शुल्क किंवा कराराअंतर्गत असलेले इतर शुल्क जे ५०० रुपयापर्यंत (फक्त ५०० रुपये मात्र) असेल ते प्राप्त झाल्यानंतर मुदतपूर्व कर्ज परतफेड पत्र सादर करेल , हे शुल्क (कर आणि इतर शुल्काचा समावेशासहित) मिळाल्यानंतर ते कर्जाची सर्व रक्कम मिळाल्यानंतर कर्जदाराला मुदतपूर्व कर्ज समाप्ति शुल्क एकरकमी स्वरूपात परत देणे/न देणे याचा अंतिम अधिकार कर्ज देणाऱ्याला राहील. हे शुल्क आम्हाला अदा केल्यानंतर कोणत्याही स्वरूपात परत केले जाणार नाही व ते आमचे उत्पन्न असेल.

९. करारानुसार ठरविलेला व्यवहार हा कर्ज परतफेडीचे वेळापत्रकात दिलेल्या व्याजदरानुसार होईल("व्याजदर") हा व्याजदर कर्ज वितरीत झाल्याच्या तारखेपासून ते शेवटच्या **देय रक्कमेची तारीख** पर्यंत जेव्हा देय रक्कमेचा हफ्ता नियमांप्रमाणे (येथे कर्जदार हा नियमावलीत बांधलेला असतो) त्या वेळापत्रकात असेल त्यादिवशी किंवा कोणताही करार ज्यामध्ये तुम्ही पार्टी असाल तेव्हा करावे लागेल. त्याला **"कर्जफेडीचे वेळापत्रक"** जे कर्ज देणाऱ्याकडून कर्जदाराला लिखित स्वरुपात(पत्र, फॅक्स, इमेल, किंवा कोणताही इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये) ज्यामध्ये "देय रक्कमेचे समान हफ्ते" देय तिथीला बाकी असतात. कर्ज देणाऱ्याने कर्ज परतफेडीचे वेळापत्रक सही केल्यानंतर १४ बिजनेस दिवसांच्या आत देय रक्कमेचे समान हफ्ते" देण्यासाठीची देय रक्कमेची तारीख कर्जदाराला कळविणे आवश्यक आहे. कर्ज देणाऱ्याने निर्धारित केल्यानुसार देय रक्कमेचे समान हफ्ते देय तिथीला अदा करणे आवश्यक आहे आणि तुम्हाला बंधनकारक याबरोबरच कर्जदाराने सूचक कोटेशनद्वारे अधिकृतरीत्या मान्यता दिल्यानंतरच कर्ज देणारा हे शुल्क व्हेंडर ज्याच्याकडून खरेदी केली , किंवा ज्याच्याकडून कर्जदाराने इक्विपमेंट खरेदी करण्याचे निश्चित केले आहे त्याकडून वसूल करेल. **"पूर्वलक्षी व्याज"** म्हणजे कर्जदाराने कर्ज परतफेड वेळापत्रकावर सही केल्याच्या तारखेपासून ते कर्ज मिळालेल्या तारखेपर्यंतचे जी कर्ज परतफेड वेळापत्रकावर दिली आहे त्या दिवसापर्यंत कर्जावर नियमानुसार आकारलेले व्याज, पूर्वलक्षी व्याज हे कर्जदाराने त्याच्या कर्जाच्या कालावधित अदा करावे.

१०. करारामध्ये काहीही उलटपक्षी लिहिले असेल तरी, आम्ही व्याजदर वाढविण्याचा अधिकार राखून ठेवतो आणि कर्ज परतफेड वेळापत्रक बदलवू शकतो, अपवादात्मक स्थितीत त्यासाठी १५ दिवसांची नोटीस देणे आवश्यक आहे त्याचा निर्णय आम्ही घेऊ शकतो.

११. या कराराअंतर्गत आम्हाला अदा करण्यात आलेली रक्कम ही कोणत्याही अवरोधाशिवाय, अटीशिवाय, कोणत्याही कराच्या वजावटीशिवाय(स्थगित), कोणत्याही दाव्याच्या पूर्ततेसाठी द्यायची आहे. तुम्ही मान्य केले आहे की या कराराच्या उचित व्यवहाराप्रती तुम्ही प्रतिबद्ध आहात आणि सर्व करांसाठी तुम्ही जबाबदार आहात.

१२. जर कोणत्याही वेळी या कराराचे उल्लंघन झाल्यास, किंवा कायदेशीर बाबी पाळल्या गेल्या नाही किंवा या कराराबाबत कोणतेही बंधन आल्यास हा करार रद्द समजण्यात येईल आणि तुम्हाला पतसुविधेची रक्कम आगाऊ परत करावी लागेल.

१३. कर्जदाराने आपले सर्व थकीत रक्कम कर्ज देणाऱ्याच्या अटींवर आणि गरजेनुसार अदा करावे, त्यांनी ही रक्कम कर्ज देणाऱ्याच्या मुंबई येथील बँक खात्यात आमच्या वेळोवेळी असलेल्या निर्देशानुसार आणि कर्ज देणाऱ्याच्या अधिकारात द्यावे (१) १ दिवसीय कॅलेंडर नोटीस, करारानुसार देय रक्कम कर्ज देणाऱ्याच्या मुंबईबाहेरील खात्यात किंवा अनेक खात्यात जमा करणे. करारानुसार तुम्ही तुमच्या बँकेला निर्देश दिले पाहिजेत की ही रक्कम ही ऑटोमेटेड क्लीअरन्स किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, किंवा आमच्या गरजेनुसार वेळोवेळी बदलणाऱ्या माध्यमातून अदा करावी लागेल. जर आपण दिलेले देय रक्कमेचे निर्देश अथवा चेक वटला माही तर त्यासाठी तुम्हाला ५००/- (पाचशे रुपये मात्र) दंड भरावा लागेल. या कराराअंतर्गत जोपर्यंत तुम्ही कोणतीही देय रक्कम अदा करत नाही तोपर्यंत तुम्हाला या व्यवहाराची कर्जदाराच्या प्रतिनिधी ची स्वाक्षरी आणि स्टँप असलेली लिखित पावती मिळणार नाही.

१४. जर देय रक्कमेची तारीख ही बिजनेस दिवसाच्या व्यतिरिक्त आली तर त्या दिवसाआधीचा दिवस हा देय रक्कमेचा दिवस आहे असे मानण्यात येईल.

१५. कर्ज देणारा हा, स्वतः च्या अधिकाराने आणि योग्य व्यवहाराने, कराराअंतर्गत कर्जदाराकडून रक्कमेचा स्वीकार करतो तो फक्त कर्जदारांच्या ऋणामुळेच देय रक्कमेचा स्वीकार करतो.

१६. तुम्ही सादर करता आणि हमी देता की,(i) या करारात सहभागी होण्याची पात्रता तुमच्यात आहे आणि या करारात असलेल्या नियम व अटी तुम्ही पूर्ण करतात. आणि ते करण्यासाठी तुम्ही योग्य ती पावले उचलतात.; (ii) तुम्हाला कोणतीही अधिग्रहणाची नोटीस मिळालेली नाही.; (iii) तुम्ही कोणताही कायद्याचे उल्लंघन केलेले नाही (येथे कर्जदार हा नियमावलीत बांधलेला असतो); (iv) तुम्ही दिवाळखोरीत नाही, कर्जबाजारी नाही किंवा तुम्ही घेतलेले कर्ज परतफेड करू शकत नाही आणि यासंदर्भात तुम्हाला कोणतीही नोटीस प्राप्त झालेली नाही.; (v) तुम्ही दिलेली सर्व माहिती ही सत्य आहे आणि कोणत्याही बाबतीत दिशाभूल करणारी नाही; (vi) तुमच्याविरुद्ध कोणताही दावा, कायदेशीर कारवाई, कोणत्याही स्वरूपाची धमकी नाही.; (vii) तुम्ही तारण/गहाण केलेल्या गोष्टीची मालकी तुमच्याकडेच आहे (नसेल तर विशद करा), जी कोणत्याही पाशाव्यतिरिक्त आहे व भविष्यात सुद्धा विनापाश राहणार आहे आणि ती आमच्याप्रती विश्वास दाखविणारी आहे.; (viii) असा कोणताही प्रसंग जो पुढील बाबींवर प्रतिकूल परिणाम करेल : (a) इक्विपमेंट; (b) आर्थिक स्थिती, मालमत्ता, दायित्व, प्रॉपर्टी, कार्याचा परिणाम, इतर स्थिती (जसे आर्थिक), पत आणि कर्जदाराचा व्यवसाय; किंवा (c) पतसुविधेसंदर्भात इतर कोणत्याही कराराची वैधता आणि लागू नियम किंवा कर्ज देणाऱ्याचे अधिकार **("मटेरियल प्रतिकूल परिणाम")** तयार होतो.; आणि (ix) तुम्ही कोणत्याही सरकारी कर आणि वैधानिक देय रक्कमेचे थकबाकीदार नाही.

१७. तुम्ही तुमच्या आर्थिक परिस्थितीबद्दल आम्हाला योग्य ते कळवावे किंवा तुमच्या व्यवसाय किंवा इक्विपमेंट बद्दल वेळोवेळी आम्हाला हवी असलेली माहिती देणे आवश्यक आहे.

१८. तुम्ही पुढील गोष्टी करू नयेत (i) इक्विपमेंट ची विक्री, पोट-गहाण, पोट-भाडे किंवा ते नष्ट करणे, (ii) कोणत्याही सिक्युरिटी व्याजाला परवानगी देणे किंवा कोणत्याही इक्विपमेंट जोडणे., (iii) इक्विपमेंट कोणत्याही भागात ठेवणे जेणेकरून तो त्या भागाचा घटक होईल., (iv) इक्विपमेंट ला बदलविणे किंवा त्यासाठी परवानगी देणे, आणि/किंवा, (v) आमच्या लेखी संमतीशिवाय कर्ज परत फेड वेळापत्रकात दिल्यानुसार कर्जदाराच्या ठिकाणापासून असलेल्या पत्त्याव्यतिरिक्त इतर पत्त्यावर इक्विपमेंट चे स्थान बदलविणे.

१९. तुम्ही आम्हाला पुढील गोष्टी त्वरित कळविल्या पाहिजेत (i) any तुम्हाला माहिती असलेल्या गोष्टींमध्ये आमच्या अधिकारांचे उल्लंघन (ii) जोखीम असलेला कोणताही प्रसंग.

२०. कराराच्या संपूर्ण कालावधीत, तुम्ही तारण/गहाण केलेली मालमत्ता सुस्थितीत आणि बाजारयोग्य ठेवणे हे तुमचे कर्तव्य आहे, आणि तिचे विम्याद्वारे जोखीमेपासून आमच्या अपेक्षेनुसार संरक्षण करणे, . विमा काढल्यानंतर विम्याचे हफ्ते हे नियमितपणे भरणे आणि त्यासंदर्भातील दस्तावेज आम्हाला सादर करणे आवश्यक आहेत. कराराच्या क्लॉज ३ नुसार पतसुविधा विम्यासाठी वापरता येईल, आणि तुम्हाला हे समजले असून मान्य आहे की गहाण केलेली मालमत्तेचा विमा काढणे ही तुमची जबाबदारी आहे, पण ही फक्त एका कालावधीसाठी नसून पतसुविधेच्या संपूर्ण कालावधीसाठी राहील. पूर्वग्रह न होऊ देता, तुमची ही जबाबदारी आहे की तारण/गहाण केलेल्या मालमत्तेचे चे विम्याद्वारे जोखीमेपासून संरक्षण करणे, जर या बाबीत तुम्ही अपयशी ठरले तर आम्ही तुमच्यातर्फे या मालमत्तेचा विमा काढू आणि त्यासंदर्भात लागलेली रक्कम तुमच्याकडून तुमचे मुखत्यार बनून वसूल करू. ही सर्व रक्कम आम्ही तुमच्याकडून सहाय्यक शुल्क ७५०० /_ (सात हजार पाचशे रुपये मात्र) म्हणून घेऊ. विमा काढणे किंवा नूतनीकरण करणे यासाठी आम्ही पतसुविधेचा वापर करू. तुम्ही आम्हाला अनिवार्यपणे मुखत्यार म्हणून नेमले आहे, ज्यात वार्षिक, काही कालावधीत विमा रक्कम अदा केली जाईल जी कर्ज परतफेड वेळापत्रकात दिली आहे ज्यात विमा प्रतिनिधी, इतर पार्टीज जे कर्जदाराने निर्धारित केले आहेत, जर कर्जदारांकडून प्रस्ताव अर्जासहित इतर काहीही चूक झाली तर : (i) आमच्या अधिकारात विमा पॉलिसी रद्द होईल, कराराअंतर्गत असणाऱ्या कलम १५ नुसार कालावधी समाप्त न झालेल्या विमा पॉलिसी ची रक्कम परत मिळेल; किंवा (iii) आमच्या अधिकारात विमा पॉलिसीचे हस्तांतरण होईल.

२१. सिक्युरिटी इंटरेस्ट चे निर्माण करून त्यामध्ये आमच्या हिताकरिता सुरक्षा असणे आवश्यक आहे, जोपर्यंत पतसुविधा पूर्णपणे आमच्या नियमांप्रमाणे देय थकबाकी पर्यंत अदा होत नाही तोपर्यंत सिक्युरिटी अस्तित्वात असणे आवश्यक आहे. आपल्या दायित्वावर दिवाळखोरी किंवा अन्य गोष्टींमुळे परिणाम नको किंवा त्याचे अवमूल्यन नको. "**सिक्युरिटी इंटरेस्ट**" म्हणजे गहाण, प्रतिज्ञा, तारण, असाइनमेंट, आर्थिक ठेव, बोजा, लीन अमाउंट (वैधानिक आणि इतर), नकारात्मक प्रतिज्ञापत्र, प्राधान्य, किंवा इतर कोणत्याही प्रकारचा मुक्त करार जसे (i) कोणताही परिस्थितीजन्य विक्री किंवा कराराचे शीर्षक धारणा, कोणताही पतपुरवठा किंवा वैधानिक नोटीस, कोणताही मागीलप्रमाणे असणारा भाडेकरार, आणि (ii) कर्जदाराची पत जाणे किंवा त्यासंदर्भातील विमा. कर्जदार हा कर्ज देणाऱ्याला अनिवार्यपणे त्याचा मुखत्यार बनवतो आणि त्याच्यातर्फे सही करणे, सील मारणे, करार करणे, सर्व कागदपत्रांची पूर्तता, करार, कायदे, इंन्स्ट्रूमेंट जे कर्ज देणारा योग्य समजतो ते सर्व. (a) सिक्युरिटी इंटरेस्ट निर्माण करून तो अंमलात आणणे, सिक्युरिटी इंटरेस्ट फक्त वाहन नोंदणी साठी अधिकृत अधिकार जे कायद्याप्रमाणे आहेत त्या वाहनाच्या नोंदणीसाठी मर्यादित नाही. , (b) कराराच्या कलमांच्या अंमलबजावणी, वितरण आणि कामगिरी साठी, (c) सिक्युरिटी इंटरेस्ट साठी व कर्ज देणाऱ्याचे हक्क, अधिकार आणि सामर्थ्य याचा उचित प्रयोग करण्यासाठी, (d) कर्जदारावर कोणतेही बंधन असेल किंवा त्याने गहाण ठेवलेल्या मालमत्तेला इतर अधिकारांमुळे, विक्री केल्यामुळे, नष्ट केल्यामुळे किंवा कर्ज देणाऱ्यांच्या अधिकारात गहाण मालमत्ता वर्ग केली असेल तर कर्ज देणारा कर्जदाराचा मुखत्यार म्हणून त्याच्या वतीने सिक्युरिटी इंटरेस्ट म्हणून मालमत्तेचा संपूर्ण लाभ घेऊ शकतो.. कर्जदाराने याद्वारे मंजुरी दिली आहे व तो सहमत आहे की कोणत्याही कराराची, इन्स्ट्रुमेंट, कृती किंवा अशा ॲटर्नी किंवा पर्याय तो/ते कार्यान्वित किकरू शकतात व अशा गोष्टीची पुष्टी करतात.

२२. कर्ज देणारा, प्रत्येक मुखत्यार, अधिकारी व्यवस्थापक, एजंट किंवा इतर व्यक्ती ही गहाण केलेल्या मालमत्तेला तारण करण्यासाठी नेमलेली असते, कर्ज देणाऱ्याकडून या व्यक्तीला दायित्व आणि खर्च यांच्यासाठी शुल्क आकारणीसाठी नेमले जाईल..

२३. पतसुविधेच्या संदर्भात, कर्जदार हा सर्वप्रथम स्थावर गहाण करून आणि ते कर्ज देणाऱ्याच्या नावे होते, इक्विपमेंट हे कर्ज परतफेड वेळापत्रकात नमूद केले जाते. त्याला **("गहाण मालमत्ता")** असे म्हणतात.

२४. आपण सर्व आवश्यक फॉर्म, कागदपत्रे आणि करार सही करावेत जेणेकरून कर्ज देणारा करारानुसार प्रथम रेकॉर्ड करण्यासाठी ते दाखल करणे आवश्यक असेल, याचा इक्विपमेंट वर स्थिर शुल्क असेल जो कर्ज देणाऱ्याच्या पक्षात असेल.

२५. सिक्युरिटी इंटरेस्ट अंमलात आल्यानंतर, कोणत्याही वेळी कर्ज देणारा त्याच्या अधिकारात पुढील कामासाठी त्याचा व्यक्ती नेमू शकतो, (a)गहाण मालमत्तेचा संपूर्ण किंवा भागात ताबा घेण्यासाठी. ; (b) कर्जदाराचा व्यवसाय अधिग्रहित करणे, त्याचे व्यवस्थापन करणे.; (c) कोणतीही योजना बनविणे किंवा तडजोड करणे.; (d) गहाण मालमत्तेची विक्री, व्यवस्थापन, नष्ट करणे; (e) गहाण मालमत्तेच्या संदर्भात अशा सर्व कृती व कार्यवाही आणणे, चालु ठेवणे, अंमलबजावणी करणे आणि बंद करणे; (f) गहाण मालमत्तेसंदर्भात कर्ज देणाऱ्याचे सर्व अधिकार अंमलात आणणे. कर्ज देणाऱ्याने नेमलेल्या व्यक्तीने, त्याचा संदेश वाहक म्हणून काम पाहावे. त्याला दिले जाणारे शुल्क हे कर्जदाराकडून वसूल होते. कर्जदेणाऱ्याने नेमलेला व्यक्ती त्याचे सर्व अधिकार कायद्यानुसार अंमलात आणतो. रिसीव्हर व्यक्ती हा कर्जदाराचा एजंट असतो आणि त्याच्या कोणत्याही गैरवर्तनास, निष्काळजीपणा ह्यासाठी कर्ज देणारा जबाबदार नसतो.

२६. सर्व गहाण मालमत्ता, त्याची विक्री किंवा विमा ही सर्व मालमत्ता कर्ज देणाऱ्याची राहील. कर्ज देणाऱ्याला ज्या स्वरुपात गहाण मालमत्तेचा तपशील मागेल त्याच स्वरुपात निहित अर्जात ती माहिती द्यावी लागेल.

२७. जर आमच्या नियमाप्रमाणे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन झाल्यास, पुढील गोष्टींसाठी मर्यादित राहणार नाही: (i) जेव्हा देय रक्कम बाकी असेल आणि तुम्ही त्याचे देयक ज्यात मुद्दल आणि व्याज यांचा समावेश आहे ते दिले नाही., (ii) या करारानुसार तुम्ही कोणत्याही अनुचित प्रकार, हमी, करार यांचे उल्लंघन. (iii) कोणत्याही प्रकारचे कर्ज ज्याची वैधता संपलेली नाही आणि ते देय आहे., (iv) तुम्ही दिवलखोरीत आहात आणि तुमचे कर्ज फेडू शकत नाही.; (v) आपल्या मालमत्तेच्या सर्व किंवा कोणत्याही महत्वाच्या भागासंबंधी एक लिक्विडेटची नियुक्ती; (vi) तुमच्या मालमत्तेला दिलेली हमी नष्ट होणे; (vii) इक्विपमेंट धोक्यात आहे किंवा त्याचे नुकसान झाले आहे किंवा कर्जदाराने इक्विपमेंट त्याग केला; (viii) आपण आपला व्यवसाय बंद केला आहे किंवा त्याचा काही भाग बंद केला आहे किंवा त्या स्वरुपाची नोटीस दिली आहे; (ix) या कराराअंतर्गत दिलेली हमी तुम्हाला पाळता येत नाही आणि ते बेकायदेशीर आणि अवैध आहे.; (xi) हा करार कोणत्याही इतर कारणाने रद्द झाला असेल तर ; किंवा (xii) जर मटेरियल प्रतिकूल परिणाम झाला असेल तर आपण पुढील गोष्टी करू शकतो: (a) आम्ही तुम्हाला थकबाकी असलेली देय रक्कम लगेच भरण्यासाठी एक (१) कॅलेंडर दिवसाची मुदत देऊ शकतो.; (b) कर्ज देणाऱ्याचे अधिकार आणि प्रक्रिया यांची गहाण मालमत्तेसंदर्भात अंमलबजावणी करू शकतो.; (c) पुढील पतसुविधा हफ्ते काढण्याला प्रतिबंध करून जो भाग कर्ज म्हणून कर्जदाराकडून उचललेला नाही तो रद्द करू शकतो.; (d) गहाण मालमत्ता अधिग्रहित करून त्याचा ताबा घेणे आणि त्याची माननीय कोर्टाच्या परवानगीशिवाय विक्री, वर्ग करणे, हस्तांतरण किंवा लिक्वीडेट करणे आणि अशा प्रक्रियेचा भाग असणे.; (e) कोणताही व्यक्ती जो कर्ज देणाऱ्याला काही देणे लागतो त्याला परस्पर सूचना देणे.; (e) बळजबरीने इक्विपमेंट चा ताबा घेणे; किंवा (f) आमच्यावर कायद्यानुसार कोणतीही कारवाई करणे.

२८. भारतीय कंत्राटी कायदा, १८७२ च्या सेक्शन १५१ मध्ये नमूद केलेल्या कलमानुसार, जर इक्विपमेंट कर्जदाराच्या ताब्यात असेल तर कर्ज देणारा किंवा त्यांचे कार्यालय, एजंट किंवा नामनिर्देशित व्यक्ती हे कोणत्याही प्रकारचा तोटा, हानी, मर्यादा किंवा इक्विपमेंट चा घसारा यासाठी जबाबदार राहणार नाही किंवा त्यावरील अबकारी किंवा अबकारी च्या व्यतिरिक्त असलेल्या शुल्कासाठी जबाबदार नाही. अशा प्रकारचा तोटा, हानी, मर्यादा किंवा इक्विपमेंट चा घसारा ही कर्जदाराची जबाबदारी असेल.

२९. जर आमच्या नियमाप्रमाणे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन झाल्यास (ज्यात कर्ज परतफेड देय रक्कम न देणे, दंड, किनाम्त, खर्च किंवा कराराअंतर्गत नमूद केलेली रक्कम जी करारानुसार देय आहे त्या तारखेस किंवा कर्ज देणाऱ्याने केलेली मागणी तारीख जी आधी येईल ती). तुम्हाला या थकबाकीच्या कालावधीवर व थकबाकी रक्कमेवर ३० टक्के (३०%) इतका व्याजदर द्यावा लागेल. हा दंडात्मक व्याजदर आम्ही नियमानुसार आकडेमोड करून मागणी केल्यानंतर लगेचच कर्ज परतफेड वेळापत्रकात दिलेल्या तारखेनंतर आपल्याला भरायचा आहे

३०. आपण याद्वारे आम्हाला कोणत्याही निधी किंवा अन्य खर्च, नुकसान, खर्च किंवा उत्तरदायित्वाच्या परिणामस्वरुप निरंतर आमच्यावर खर्च केल्याबद्दल नुकसानभरपाई ची मागणी करू शकत नाही किंवा पुढील कारणाने (a) कोणत्याही कारणाने कर्ज परतफेड कर्जदाराकडून थकीत झाले तर; (b) कोणतीही अपरिपूर्ण, नियमांचे उल्लंघन, चुकीची माहिती, दिशाभूल करणारी बाब, चुकीची हमी देणे; (c) कर्ज देणाऱ्याने कर्जाच्या मोबदल्यात किंवा थकीत रक्कमेची केलेली वसुली.; (d) जर आमच्या नियमाप्रमाणे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन झाल्यास किंवा ती प्रक्रिया चालू राहिल्यास.; किंवा (e) सदोष इक्विपमेंट मुळे कोणत्याही प्रकारचा दावा, हानी मुळे कर्ज देणाऱ्यावर परिणाम होणे.

३१. आम्ही आपल्याला या कराराद्वारे केलेल्या कोणत्याही दायित्वाविरुद्ध किंवा कोणत्याही अन्य कराराच्या किंवा कर्जासाठी आपल्याकडून कोणतेही बंधन तयार करू शकतो.

३२. या कराराद्वारे कोणतेही कर्ज पास झाले अथवा नाही, या कर्जासंबंधीचा सर्व खर्च आणि किंमत ही करारानुसार कर्जदाराला द्यावे लागतील.

३३. सर्व व्याज(डीफॉल्ट व्याज वगळता) हे प्रत्येक दिवशी मोजले जातील आणि ३६५ दिवसांकरिता किंवा लीप वर्ष असेल तर ३६६ दिवसांकरिता किंवा काही कॅलेंडर दिवस संपले असतील तर त्याप्रमाणे मोजले जातील. कर्ज देणारा कर्जदाराच्या खात्यात त्या दिवशी रक्कम टाकेल जेव्हा सर्व करारनामा अस्तित्वात येऊन कर्ज देणाऱ्याला पतसुविधेसाठी सकारात्मक संकेत मिळेल, अश्या परिस्थितीत, त्यांच्या देय दिनांकापूर्वी कर्जदाराचे कर्ज रक्कम खात्यात जमा होण्याअगोदर प्राप्त झालेल्या रकमा जमा केल्या जातील. कर्ज दाराच्या खात्यात कर्ज देणाऱ्याने केलेल्या नोंदी या प्राथमिक दृष्टीने कर्जदाराची बंधने आणि त्याचे अस्तित्व दर्शवितात. करारानुसार कर्जदाराने देय असलेल्या कोणत्याही रकमेनुसार कर्ज देणाऱ्याने जारी केलेले प्रमाणपत्र प्रकट त्रुटीसाठी निर्णायकपणे जतन केले जाईल.

३४. ग्राहकांना पत पुरवठा करण्याचा निर्णय, ग्राहकांसाठी ठरविलेला व्याजदर आणि जोखिमेचा स्तर हा प्रत्येक प्रकरण-ते-प्रकरण (केस-टू-केस) घेतला जातो त्यामध्ये एकापेक्षा जास्त गोष्टींचा विचार केला जातो ज्यामध्ये: मालमत्ता जिच्यावर कर्ज दिले जाणार आहे आणि कर्जाचा उद्देश, ग्राहकांचे खात्याची पत आणि परतफेड क्षमता, मागील कर्जाच्या परतफेडीचा मागोवा, खेळते भांडवल आणि इतर कर्ज, उपलब्ध असणारे तारण, पत वाढविण्याचा इतिहास, मुळची पत आणि कर्ज न चुकविण्याचा धोका, आणि इतर कर्ज, उपलब्ध सुरक्षा, पत वाढविणे, निहित पत आणि जोखीम, पतसुविधेची किंमत, इतर उपलब्ध पतसुविधा, व्याजावरील सबसीडी/बदलणारे व्याजदर किंवा सुट, मार्जिन

आणि विमा जोखीम, कर्जाचा कालावधी आणि कर्ज टर्म, कर्जदाराचे भौगोलिक स्थान, किंवा आमचे स्पर्धात्मक अस्तित्व. वरील सर्व माहिती ही ग्राहकांच्या दिलेल्या माहितीनुसार, तपासणी आणि प्रामाणिकरण, इतर घटकांपासून किंवा स्वतंत्र इतर पार्टीज उदा. क्रेडीट ब्युरो इ. कडून मिळवलेली माहिती. आमच्या अंतर्गत पॉलीसी आणि पतधोरणानुसार कर्जपुरवठ्याचे मुल्यांकन केले जाईल.. h

त्यासाठी ठरविलेला व्याजदर हा आमचा अंतिम निर्णय असेल आणि तो व्यावहरिकता आणि परिस्थितीनुसार बदलू शकतो. त्यानुसार दोन ग्राहकांना मिळालेल्या सारख्याच उत्पादनावर कर्जाचा कालावधी सारखाच असेल तरीही त्यांच्यासाठी कर्जाचा व्याजदर हा वेगवेगळा असू शकतो. वार्षिक व्याजदर हा कर्जदाराला त्याच्यासोबत झालेल्या कराराअंतर्गत जाहीर केला जातो. या मार्केट च्या विभागात स्पर्धा असल्याने कर्जदाराला अनेक सेवा आणि उत्पादने यांचा लाभ होतो आणि अधिक व्याजदर देण्यापासून त्यांचे नैसर्गिक सुरक्षा होते. कर्जदाराने व्याजदर वाचले असून त्याला कर्ज देणाऱ्याचा व्याजदर बदलाबाबत आणि जोखीमेचे मुल्यांकन या बाबतीत हेतू मान्य आहेत आणि ते www.dllgroup.com/in यासंकेतस्थळावर वेळोवेळी आढावा घेता येतो.

३५. या कराराअंतर्गत असणाऱ्या जबाबदाऱ्या, अधिकार हे इतर व्यक्तीला वर्ग करणे, हस्तांतरीत करणे किंवा त्यचे नूतनीकरण करू नये. आम्ही तुमच्या सहमतीशिवाय या कराराअंतर्गत असणाऱ्या जबाबदाऱ्या, अधिकार हे इतर व्यक्तीला वर्ग करणे, हस्तांतरीत करणे किंवा त्यचे नूतनीकरण करू शकतो.

३६. तूम्हाला डीएलएल चे "प्रायव्हसी स्टेटमेंट" जे www.dllgroup.com/in वर आहे ते तूम्हाला समजले असून मान्य आहे. हे "प्रायव्हसी स्टेटमेंट" अद्यतन करणे आणि बदलविण्याचा अधिकार डीएलएल ने राखून ठेवला आहे

३७. आम्ही कर्जपुरवठा आणि लीजवरील व्यवसायकरण्यासाठी तुमची बायोमेट्रिक **("माहिती)** आणि इतर माहिती (ज्यामध्ये इतर कर्ज, करा, व्याज सबसिडी, गोळा करण्यास, वापरण्यास, हाताळण्यास, साठवून ठेवण्यास, जाहीर करण्यास व नष्ट करण्यास पात्र असतील. डीएलएल ला परवानगी आहे की तुमची माहिती ही इतर थर्ड पार्टी ला आणि डीएलएल च्या सेवा प्रदाता यांच्याबरोबर मिळविली जाऊ शकते; यामध्ये डी लेग लॅंडन इंटरनॅशनल बी.व्ही., आणि त्याच्या उपकंपन्या आणि रॅबोबॅंक ग्रुप ऑफ कंपनीज (यांचा एकत्रित समूह म्हणजे"डीएलएल आहे.); क्रेडीट ब्युरो/ क्रेडीट रेफरन्स एजन्सीज, सेन्ट्रलकेवायसी रजिस्ट्री, बंक्रपसी कोड २०१६ नुसार , डीएलएल चे व्हेंडर आणि व्यावसाईक पार्टनर, भारत आणि विदेशातील शासकीय संस्था, डीएलएल चे ऑडीटर आणि कायदेविषयक सल्लागार; न्यायालय, पोलीस, भारत व भारताबाहेरील नियामक समिती आणि एजन्सी यांचा समावेश असेल; ही माहिती प्रक्रिया करण्यासाठी किंवा डीएलएल च्या गरजेनुसा भारताबाहेर पाठविली जाऊ शकते. मी/आम्ही न बदलत्या येणाऱ्या संमतीने मान्य करतो की डीएलएल इंडिया माझे/आमचे (इ-केवायसी") इलेक्ट्रॉनिक केवायसी/डिजिटल सही चे प्रमाणपत्र (डीएससी) अर्ज, मुख्य कोड निर्माण, सही निर्माण करणे, मुख्य कोड नष्ट करणे, प्रमाणपत्र जारी करणे, आधार इ-केवायसी च्या ऑथेंटीफिकेशन चा वापर करून अर्जाचा नमुना तयार करणे, डीएससी अर्ज जमा करणे आणि प्रत्येक (इ-साईन) साठी सही तयार करणे ही कामे करू.

३८. डीएलएल इंडिया ही माहिती अर्जदाराला कर्जपुरवठा देण्यासाठी वापरू शकते पण याच कारणासाठी हा वापर मर्यादित नसून, कर्ज आणि विम्याची जोखीम समजून घेण्यासाठी, पत जाणून घेण्यासाठी, डीएलएल चे आर्थिक उत्पादने आणि सेवा सुधारण्यासाठी, ज्यामध्ये डीएलएल चे कॉंट्रॅक्ट प्रशासन आहे आणि ग्राहक संबध समायोजन प्रणाली आहे जी त्यासंदर्भातील आर्थिक ॲग्रीमेंटस बनविणे आणि अंमलात आणणे यासाठी काम करते, जी सगळ्या प्रकारच्या कायद्याचे पालन करते, कोणत्याही प्रकारच्या घोटाळे आणि अवैध सावकारी ला प्रतिबंध करते, सरळ मार्केटिंग करून डीएलएल आणि ग्राहक यांचे आर्थिक हितसंबध वाढविते इ. , त्यासाठी मार्केट चा वेळोवेळी आढावा घेते. ह्या गोष्टींसाठी ग्राहकांच्या माहितीचा वापर केला जाऊ शकतो. डीएलएल किंवा त्यांचे अधिकृत सेवा प्रदाता (थर्ड पार्टी) हे अर्जदाराला फोनवर, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, एसएमएस वरून, पोस्टानेकिंवा इतर उपलब्ध माध्यमातून संपर्क करू शकतात. डीएलएल ही माहिती त्यांच्या आर्थिक उत्पादनांसाठी कार्यकारी मंडळ, त्यांना लागू करण्यासाठी, आणि प्रतिभूती करण्यासाठी, इतर पतपुरवठादार कंपन्या किंवा पैसा उभा करण्यासाठी वापरू शकतात.

३९. तुम्ही अनिवार्यपणे सहमती देऊन आम्हाला आम्हाला जाहीर गोष्टी, अहवाल, माहिती आणि कर्जाच्या स्थितीची माहिती, तुमच्या देय रक्कमेबाबत बदल, आमच्या सहमतीने कराराबाबतचे वेळोवेळी होणारे बदल, क्रेडीट ब्युरो, रिपोर्टिंग संस्था, नियामक मंडळ, कायदेसंस्था, अर्ध-नियामक किंवा संस्था समिती यांना माहिती पुरविण्यास परवानगी देत आहात. . तुम्हाला मान्य आहे की तुम्ही आम्हाला कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, वाईट परिणाम, इजा किंवा खर्च जो तुम्हाला लागला आहे त्यासाठी आम्ही जबाबदार राहणार नाही.

४०. वैकल्पिकरित्या, तुमची संमती आहे की डीएलएल च्या सहाय्याने स्विकारलेल्या प्रस्तावाचा फॉर्म डीएलएलद्वारे विमा संरक्षण तूम्ही निवडले आहे. तूम्ही विमा कंपनी/अनेक विमा कंपन्यांकडून देण्यात आलेल्या प्रस्तावाचा फॉर्म/फॉर्म्स आणि त्यामधील अटी जाणून घेतल्या असून त्या तुम्हाला मान्य आहेत. तुमची मान्यता आहे की यासाठी कायद्यानुसार आणि नियमांनुसार दिलेल्या विम्याच्या कमिशन च्या उत्पन्नातून डीएलएल च्या विमा तत्त्वानुसार असलेली फी, मध्यस्त फी किंवा त्यासंदर्भात काम केलेल्या व्यक्तीची फी अदा करण्याचा अधिकार डीएलएल ला राहील.

४१. आपल्याला हे मान्य आहे की विशिष्ट बॅंकेकडून आकारण्यात येणारे प्रचलित कर्ज दर भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या प्रकाशित दरापेक्षा अधिक आहेत, आणि कर्ज देणाऱ्याने त्याची पूर्ण किंवा भागश: भरपाई केली आहे, त्याचे स्वरूप पतसुविधा दर, फीस, दंड आणि व्याजावरील सबसिडी/बदलते दर, वेगवेगळी देय माध्यमे जी व्हेंडर अथवा थर्ड पार्टी कडून आकारली जाते. तुम्हाला मान्य आहे की यासंबधीत योजनेला तुमचा विरोध नाही किंवा तुमच्या अनुमतीची गरज नाही आणि यासंबधीत तुम्हाला कोणतीही माहिती कर्ज देणाऱ्याने सांगावी हे बंधनकारक नाही.

४२. या कराराअंतर्गत केले गेलेले कोणताही संवाद हा फॅक्स किंवा लिखित स्वरुपात पार्टीज ने दिलेल्या केला गेला पाहिजे. पत्त्यावर तुमच्या कडून केला गेलेला संवाद हा अपरिवर्तनीय, आणि आम्हाला प्राप्त होईपर्यंत प्रभावी होणार

४३. या कराराच्या कोणत्याही तरतुदीची बेकायदेशीरता, अवैधता किंवा निष्पादनक्षमता कोणत्याही अन्य क्षेत्रातील कायदेशीरपणा, वैधता किंवा अंमलबजावणीवर परिणाम करणार नाही किंवा कोणत्याही अन्य तरतुदीची वैधता, वैधता किंवा अंमलबजावणी कोणत्याही न्यायालयीन कक्षेत करता येणार नाही.

४४. दोन्ही पार्टीज मधील हा करार तत्वावर आधारित असून याद्वारे त्यांच्यामध्ये किंवा त्यांच्या व आमच्यामध्ये कोणतेही मालक-कर्मचारी, मुकादम-एजंट, कर्मचारी, अधिकारी, कर्मचारी वृंद, अजंत किंवा तुमचा प्रतिनिधी हे नाते निर्माण होणार नाही.

४५. या करारानुसार जी व्यक्ती पार्टी नाही तिला या करारासंदर्भात कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

४६. हा करार आणि इतर करार एकाच विषयासंदर्भात असतील तर दोन्ही पार्टीज दरम्यान झालेला अलीकडील करार किंवा समज आधीच्या करारावर मात करेल.

४७. कर्ज देणाऱ्याच्या अधिकारांवर कोणतीही मर्यादा नाही आणि त्यासाठी विलंब होणार नाही, कोणताही अधिकार किंवा तोडगा त्यासाठी सूट म्हणून कार्य करेल, त्यासाठी कोणताही एकल किंवा अर्ध अधिकार हा पुढील अधिकारांच्या वापरास प्रतिबंध असेल. कराराअंतर्गत दिलेले अधिकार आणि सुट हे अनन्य नाहीत.

४८. जर दोन्ही पार्टीज ची लिखित स्वरुपात परवानगी असेल तर हा करार विस्तारित अथवा पूरक वाढ करण्यात येईल, कोणत्याही बाबीचे उल्लंघन, किंवा धोका यांचे निरसन फक्त कर्ज देणाऱ्याने लेखी संमती दिल्यानंतर होईल. कर्ज देणाऱ्याची कोणतीही संमती फक्त त्यांनी (कर्ज देणाऱ्याने) लिखित स्वरुपात दिली त्यावेळी ग्राह्य धरण्यात येईल.

४९. कर्ज देणारा कर्जाचा अर्ज भारतातील स्थानिक भाषांत प्रकाशित करेल, जर स्थानिक आणि इंग्रजी भाषेतील अर्जामध्ये तफावतीची तक्रार असेल तर त्याच्या योग्य अर्थासाठी मूळ इंग्रजी भाषेतील अर्ज पार्टीज आणि न्यायालय यांच्याद्वारे अर्थ समजण्यासाठी कंत्राट बांधताना ग्राह्य धरण्यात येईल.

५०. हा करार भारतीय संविधानानुसार अस्तित्वात आला आहे, याबाबतचे सर्व वाद, लवाद, यातून उत्पन्न होणारे चालू दावे, किंवा त्याला संदर्भात धक्का पोहोचला, वाद, किंवा त्यावर परिणाम झाला तर, किंवा पार्टीज च्या अधिकार आणि दायित्व यांना धक्का पोहोचला तर असे लवाद हे १९९६ च्या "लवाद आणि पुनर्रचना - आरबीट्रेशन आणि रिकन्सीलेशन कायदा' जो याआधी वेळोवेळी विस्तारित केला गेला आहे किंवा भविष्यात यासंदर्भात संसद लवादासाठी जो नवीन कायदा अंमलात आणेल याद्वारे सोडवला जाईल. दोन्ही पार्टीजमध्ये लवाद सोडविण्यासाठी कर्ज देणारा त्याच्या अधिकारात एक लवादप्रमुख नियुक्त करेल. मृत्यू झाल्याने, नकार दिल्याने, दुर्लक्ष केल्यामुळे, अक्षमतेमुळे, अकार्यक्षम व्यक्तीमुळे जर लवादप्रमुख आपली भूमिका व्यक्त करत नसेल तेव्हा कर्ज देणारा नवीन लवादप्रमुख नेमू शकतो. लवादाची सोडविण्याची एकत्रित भाषा इंग्रजी असेल. लावादप्रमुखाने केलेला निर्णय हा अंतिम असून तो दोन्ही पार्टीज ना मान्य करावा लागेल. लवादाचा खर्च हा पार्टीजने करायचा असून तो लवादाच्या घटनेत लिहिला आहे. कर्ज देणाऱ्याच्या अधिकारात, लवादाचा निवाडा हा दिल्ली किंवा दिल्ली एनसीआर किंवा मुंबई येथे माननीय न्यायालयात केला जाईल व या कराराअंतर्गत असणाऱ्या कोणत्याही वादासंबधित निकाल हा वर दिलेल्या शहरातील न्यायालयीन कक्षेत होईल आणि कर्जदार हा अनिवार्यपणे या न्यायालयात आपला दावा करेल

**या करारानुसार** कर्ज परतफेड वेळापत्रकानुसार देय तिथीला हा करार अस्तित्वात आला आहे.

| **कर्जदार** | सही |
|---|---|
| कर्जदाराचे नाव:<br>पत्ता: | |
| सहकर्जदाराचे नाव:<br>पत्ता: | |

तारीख: _______________, २०___

मी जाहीर करतो की मी कर्जदार आणि सहकर्जदार यांना कराराच्या अटी त्यांच्या स्थानिक भाषेत त्यांनी या करारावर सही अथवा अंगठा देण्यापूर्वी तोंडी सांगितल्या आहेत.

सही:

नाव:

हुद्दा:

कर्मचारी क्रमांक:

## LOAN AND HYPOTHECATION AGREEMENT - AMENDMENT

1. This refers to the master Loan and Hypothecation Agreement dated ____________________ ("**Agreement**") entered into between De Lage Landen Financial Services India Private Limited ("**Lender**") and ______________________________________________ ("**Borrower**") (hereinafter collectively referred to as "**Parties**"). All terms defined in the Agreement have the same meaning in this Amendment ("**Amendment**").

2. Pursuant to the relevant enabling clause of the Agreement, the Parties hereby agree to the following amendment to the Agreement.

   i. References to fees, charges shall hereby be respectively replaced and superseded and new fees, charges hereby introduced as noted in the table below:

| Sr. no | Fee / charge | Rate (applicable tax shall be payable over and above the below fee / charge) |
|---|---|---|
| 1. | Processing fee | up to 2% of Facility amount |
| 2. | Doorstep payment collection fee | INR 250/- per doorstep visit for collecting any payment / repayment |
| 3. | Dishonour of payment instrument / instruction | INR 500/- per cheque dishonour and INR 75/- per instance of dishonour of ECS or ACH mandate |
| 4. | Issuing a Statement of Account (SOA) | INR 200/- per SOA |
| 5. | Issuing a balance confirmation statement | INR 100/- per instance from the second instance onwards |
| 6. | Per copy of Repayment Schedule | INR 250/- |
| 7. | Change in Repayment Date among alternatives made available by the Lender without any change in the Interest Rate or Loan term | INR 500/- per change |
| 8. | Issuing a prepayment quote | INR 100/- per prepayment quote |
| 9. | Prepayment fee | 4% of the Loan amount prepaid plus other costs, loss, expense or liability sustained or incurred by the Lender arising from the prepayment |
| 10. | No dues / No objection certificate / confirmation | INR 500/- per certificate / confirmation from the second instance onwards |
| 11. | Providing a copy of the Borrower's credit bureau report if available with the Lender | INR 100/- per copy provided |

   The Lender hereby reserves the right to levy new fees, charges, costs etc., and to revise existing fees and charges prospectively after publishing them on its webpage www.dllgroup.com/in.

3. This Amendment is governed by and shall be construed in accordance with Indian law.

4. It is agreed and declared that the provisions of the Agreement shall prevail save to the extent specifically amended or modified by this Amendment and it is expressly reiterated that the same shall, save to the extent as amended and modified, continue to operate in all respects.

(B-2, CB-2)

5. This Amendment shall form an integral part of the Agreement and shall be read along with the Agreement and all terms shall apply *mutatis mutandis* to this Amendment. All references in the Agreement to "this Agreement" shall include the reference to this Amendment wherever the context so requires. Further, references to the Agreement in any other documents shall include reference to the Agreement as amended by this Amendment.

IN WITNESS WHEREOF this Amendment has been entered into on ______________________.

| Borrower | Co-Borrower |
|---|---|
| Signature: ______________________ | Signature: ______________________ |
| Name: ______________________ | Name: ______________________ |
| Co-Borrower | Co-Borrower |
| Signature: ______________________ | Signature: ______________________ |
| Name: ______________________ | Name: ______________________ |

The Lender

For De Lage Landen Financial Services India Private Limited

Signature: ______________________

Name: ______________________

Title: ______________________

I hereby confirm that I have explained the contents of this Amendment verbally to the Borrower and all Co-Borrower(s) in their local language before they put their mark/thumbprint to signify that they have signed this Amendment.

Signature: ______________________

Name: ______________________

Title: ______________________

Employee Number: ______________________

(B-1, CB-1, FSO-1)